**<u>नियमित फौजदारी खटला क्र.९८/२०२२</u>**
**<u>निशाणी क्र.१५</u>**

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | :- | लतीश शिवाजी पवार, |
| वय | :- | ५२ वर्ष, |
| व्यवसाय | :- | शेती व नोकरी, |
| राहणार | :- | शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि. धुळे, |

.......................................................................................................

**<u>सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी.पी.चव्हाण यांचे मार्फत.</u>**

दि.२६.०४.२०२२ रोजी सकाळी मी १०.०० वाजता माझ्या ऊसाच्या शेतात गेलो असता मला माझे ऊसाचे शेतातुन धुर निघतांना दिसला. त्यामुळे मी व माझे सालदार बंटी भिल असे आम्ही दोघे ऊसाच्या शेताकडे गेलो. तेव्हा मी बघितले की, आरोपी भिमराव पाटील हा आमच्या शेताजवळ उभा होता आणि त्याच्या हातात जळती मशाल होती. आम्हाला दोघांना शेताकडे येतांना पाहुन आरोपी भिमराव पाटील तेथुन पळुन गेला. त्यानंतर आम्ही दोघांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. परंतु आग बरीच पसरल्याने आम्हाला आग विझवणे शक्य झाले नाही. त्यामुळे सर्व ऊस जळुन खाक झाला. त्यानंतर आम्ही दुपारी आरोपीच्या गावी सोनेवाडी येथे गेलो. तेथे गेल्यानंतर आम्ही गावातील इतर लोकांसोबत आणि आरोपी सोबत चर्चा केली. त्यावेळी आरोपीने मीच ऊसाचे पिक जाळले असुन त्याबाबत नुकसान भरपाई देण्याची तयारी दाखवली. आरोपीने नुकसान भरपाई देण्याची तयारी दाखवल्याने आम्ही तेथुन आमच्या घरी परत आलो. आरोपीने नुकसान भरपाई देतो असे म्हणुन चालढकल केली. त्यानंतर परत मी आरोपीच्या गावी जावुन आरोपीला नुकसान भरपाई देण्याबाबत विचारणा केली. परंतु आरोपीने मला दमदाटी केली आणि मला म्हणाला की, मी तुझा ऊस जाळलेला नाही. त्यामुळे मी नुकसान भरपाई देवु शकत नाही व तुझ्याने जे होईल ते करुन घे.

त्यामुळे मी शिंदखेडा पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. फिर्यादीला **निशाणी क्र.१६पी/सा.क्र.१** देण्यात येते. मी आरोपीला बघितल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे. फिर्याद दिल्यानंतर मी दुस–या दिवशी पुरवणी जबाब देण्यासाठी पोलीस स्टेशनला गेलो होतो. त्यात मी असे नमुद केले होते की, आरोपीने माझे ऊसाचे पिक जाळल्याने माझे अंदाजे ४ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.बी.व्ही.सोनवणे यांचे मार्फत.**

माझे शिक्षण बी.ए.पर्यंत झाले आहे. मला माझ्या शेताच्या चर्तुःसिमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सोनेवाडी गावचा राहणारा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या शेतमिळकती या सोनेवाडी गावालगत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची अक्कडसे गावात शेतमिळकत असल्याबाबत त्याचे सदर शेतमिळकतीचा उतारा मी पोलीसांना दिला नव्हता. माझ्या शेतमिळकतीत मी ऊसाचे पिक लावल्याबाबतचा ७/१२ उतारा पोलीसांना दिला नव्हता. माझे वडिल त्या दरम्यान मयत झाल्याबाबत त्यांचा मृत्यु दाखला तसेच त्यांच्या उत्तर कार्याबाबतची पत्रिका मी पोलीसांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यास उशीर झाल्यामुळे मी पोलीसांना दरम्यानचे काळात माझे वडील मयत झाले होते व त्यांचा धार्मिक कार्यक्रम होता असे सांगितले होते. माझ्या शेतातील संपुर्ण ऊस जळुन माझे नुकसान झाल्यानंतर त्याच वेळी पोलीस स्टेशनला फिर्याद द्यावी असे मला वाटले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतातील ऊस कसा जळाला हे मला माहित नसल्याने मी लगेच त्याबाबत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली नाही. बंटी किसन भिल हा माझा सालदार आहे. हे म्हणणे खरे आहे की, पिंटु अभिमान भिल हा देखील माझ्याकडे कधी कधी कामासाठी येतो. पंडित एकनाथ पाटील व कांतिलाल गुलाबराव पाटील यांना मी

चांगल्याप्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, ते दोघे माझ्या समाजाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे शेत बागायती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेताच्या आजुबाजूचे शेती देखील बागायती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेताच्या आजुबाजूच्या शेतमिळकती बागायती असल्याने त्याठिकाणी सालदार तसेच मालक उपस्थित असतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना साक्षीदारांची नावे मी सांगितली होती. हे म्हणणे खरे आहे की, ब–याच वेळी ऊस जाळुन विकला जातो. हे म्हणणे खरे आहे की, मी देखील पुर्वी जेवढा ऊस विकायचा आहे तेवढा जाळुन तो विक्री केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नुकसान भरपाई मिळण्यासाठी आरोपी विरुध्द फिर्याद दिली.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर की, "दि.२६.०४.२०२२ रोजी सकाळी मी १०.०० वाजता माझ्या शेतात गेलो असता मला माझे ऊसाचे शेतातुन धुर निघतांना दिसला. त्यामुळे मी व माझे सालदार बंटी भिल असे आम्ही दोघे ऊसाच्या शेताकडे गेलो. तेव्हा मी बघितले की, आरोपी भिमराव पाटील हे आमचे शेताजवळ उभे होते आणि त्यांच्या हातात जळती मशाल होती. आम्हाला दोघांना शेताकडे येतांना पाहुन आरोपी भिमराव पाटील तेथुन पळुन गेला. त्यानंतर आम्ही दोघांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. परंतु आग बरीच पसरल्याने आम्हाला आग विझवणे शक्य झाले नाही. त्यामुळे सर्व ऊस जळुन खाक झाला. त्यानंतर आम्ही दुपारी आरोपीच्या गावी सोनेवाडी येथे गेलो. तेथे गेल्यानंतर आम्ही गावातील इतर लोकांसोबत आणि आरोपीसोबत चर्चा केली. त्यावेळी आरोपीने मीच हे केले असुन त्याबाबत नुकसान भरपाई देण्याची तयारी दाखवली. आरोपीने नुकसान भरपाई देण्याची तयारी दाखवल्याने आम्ही तेथुन आमच्या घरी परत आलो. आरोपीने नुकसान भरपाई देतो असे म्हणुन चालढकल केली. त्यानंतर परत मी आरोपीच्या गावी जावुन आरोपीला नुकसान भरपाई देण्याबाबत विचारणा केली. परंतु आरोपीने मला दमदाटी केली आणि मला म्हणाला की, मी तुझा ऊस जाळलेला नाही. त्यामुळे मी

नुकसान भरपाई देवु शकत नाही व तुझ्याने जे होईल ते करुन घे. त्यानंतर मी शिंदखेडा पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.'' हा मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला नुकसान भरपाई मिळावी यासाठी मी पोलीस स्टेशनला जावुन आरोपी विरुध्द फिर्याद दिली.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/---
(विनिता आ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः- ०३/०४/२०२५

–: प्रमाणपत्र :–

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | सचिन अरुण परदेशी |
| न्यायालयाचे नाव | :– | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,<br>शिंदखेडा, जि. धुळे. |

आदेश अपलोड केलेचा दिनांक :– ०३/०४/२०२५

सही/–––
लघुलेखक, श्रेणी–३
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा